**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र राज्य)
website: http://su.digitaluniversity.ac
Fax : 91-0217-2744777

**SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-122
Email : bcudsu@gmail.com

**जा.क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/** 6148 **दिनांक:** - 1 JUL 2016

**प्रति,**
**मा.प्राचार्य / संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये.

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील नवीन संलग्निकरण / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / नवीन विषय/अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडी /विद्यार्थी प्रवेशक्षमता वाढ/ नवीन विद्याशाखा /निरंतर संलग्निकरणाच्या प्रस्तावाबाबत. . .**

**महोदय / महोदया,**

**विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व संस्थाचालक यांना खालील प्रमाणे कळविण्यात येते की,**

१. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार शै.वर्ष २०१७-१८ पासून पदवी / पदव्युत्तर पदवीका / पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचे नवीन विद्याशाखा / विषय / निरंतर संलग्निकरण / तुकडी वाढ / प्रवेश क्षमता वाढ /संलग्निकरणाचे नुतनीकरण/ नैसर्गिक विस्तार इ.संदर्भातील प्रस्ताव महाविद्यालये / संस्थांनी विद्यापीठाकडे पाठविण्याची अंतिम तारीख **३१ ऑगस्ट, २०१६** व नवीन महाविद्यालय सुरु करण्याबाबत सादर करावयाच्या प्रस्तावाची अंतिम तारीख **३१ आक्टोंबर, २०१६** आहे. यानुसार महाविद्यालय / संस्थांनी संलग्निकरणाचे प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयाकडे विहीत वेळेत, विहीत नमुन्यात व विहीत शुल्कासह सादर करावेत.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या शासन निर्णय क्रं एनजीसी / (१९३ /१०) / मशि - ४ दि. ३०.१०.२०१०, शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२/(२४७/१२)/मशि-४, दि.०२/०९/२०१३ व विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांचे विद्यापीठांशी संलग्निकरण) अधिसूचना २००९ नुसार सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये (पारंपारीक व व्यावसायिक) विद्याशाखा, नवीन विषय/अभ्यासक्रम, वाढीव तुकडया इ.मंजूरी देण्यासाठी अर्ज मागविण्याची कार्यपध्दती निश्चित केली असून संलग्नित महाविद्यालयांनी सदर शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार सर्व प्रकारचे संलग्निकरणाचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावेत. शासन निर्णयातील कार्यपध्दतीची पूर्तता करणारेच प्रस्ताव विद्यापीठाकडे स्विकारले जातील.

**(सदर शासन निर्णय व विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांचे विद्यापीठांशी संलग्निकरण) अधिसूचना २००९ विद्यापीठाच्या <u>http://su.digitaluniversity.ac</u> या संकेतस्थळावर Download/व Circulars या मथळयाखाली उपलब्ध आहे. तसेच सदर शासन निर्णय व विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांचे विद्यापीठांशी संलग्निकरण) अधिसूचना २००९ अनुक्रमे महाराष्ट्र शासनाच्या व युजीसीच्या संकेत स्थळावर ही उपलब्ध आहे)**

३. नवीन संलग्निकरण / नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरीक्त तुकडी सुरु करण्यास्तव प्रस्ताव सादर करतेवेळी अर्जातील नियमावलीनुसार सर्व बाबींची पूर्तता करुनच आवश्यक त्या सहपत्रासह प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. (प्रस्ताव सादर करण्यापूर्वी संलग्नता विभागाकडून तपासणी करून सादर करावे.)

४. विहीत मुदतीत न आलेल्या नवीन संलग्निकरण / नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडीच्या प्रस्तावा संदर्भात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालय / संस्थेवर राहील याची नोंद घ्यावी. तसेच मुदतीनंतर सादर केलेल्या प्रस्तावांसाठी दंडकानुसार प्रति महिना विलंब शुल्क आकारण्यात येईल. (नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव विहीत मुदतीमध्येच सादर करावे मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.)

५. जून २०१७ (शैक्षणिक वर्ष २०१७-१८) पासूनच्या पदवी व पदव्युत्तर स्तरावरील नवीन संलग्निकरण / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / विद्याशाखा / विषय / अतिरिक्त तुकडी / प्रवेश क्षमता वाढी बाबत सादर करावायाच्या प्रस्तावांचे विहीत नमुन्यातील अर्ज प्रकाशन विभागाकडे (वित्त व लेखा विभागाकडे) कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) उपलब्ध आहेत.

६. नवीन महाविद्यालय, नवीन विषय/अभ्यासक्रम, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाचे व संलग्निकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव पाठविण्याबाबत सविस्तर सूचना व भरावयाच्या शुल्काची यादी सोबत जोडलेली आहे. सदर सूचनांचे व प्रस्ताव सादर करावयाच्या अर्जा सोबत दिलेल्या नियमावलीचे तंतोतंत पालन करावे.

७. शै. वर्ष २०१६-१७ पासून महाविद्यालय/अभ्यासक्रम/तुकडी बंद करण्याबाबतचे प्रस्ताव दि. ३१ जुलै, २०१६ पूर्वी सादर करावेत. तद्नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

८. महाविद्यालयाच्या नावातील बदलांचे प्रस्ताव दि. ३१ ऑक्टोंबर, २०१६ पर्यंतच सादर करावे. तद्नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही.

९. खाली नमुद केल्याप्रमाणेच प्रस्तावाच्या प्रती सादर कराव्यात.

| अ.क्र | प्रस्तावाचा प्रकार | विद्यापीठास सादर करावयाच्या प्रति |
|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय (पारंपारिक अभ्यासक्रम) | ०३ |
| २. | नवीन विषय/अभ्यासक्रम/तुकडी/विद्याशाखा/पारंपारिक | ०३ |
| ३. | नवीन महाविद्यालय (AICTE अंतर्गत येणारे अभ्यासक्रम) | ०५ |
| ४. | नवीन विषय (AICTE अंतर्गत येणारे अभ्यासक्रम) | ०५ |
| ५. | नैसर्गिक विस्तार (पारंपारिकअभ्यासक्रम) | ०२ |
| ६. | नैसर्गिक विस्तार (AICTE) | ०५ |
| ७. | निरंतर संलग्निकरण | ०२ |
| ८. | महाविद्यालयातील अभ्यासक्रम/तुकडी बंदचे प्रस्ताव | ०२ |
| ९. | महाविद्यालयाच्या नावातील बदलाचे प्रस्ताव | ०२ |
| १०. | संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव | ०१ |

१०. **तसेच शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, बी.बी.ए, बी.सी.ए, बी.एस्सी. (ईसीएस), एम.बी.ए. एम.सी.ए. व एम.एस.डब्ल्यु इ. अभ्यासक्रमाचे नवीन संलग्निकरणाचे अथवा विस्ताराचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

**संचालक**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना

१. शै.वर्ष २०१७-१८ पासून संलग्निकरणाचे नुतनीकरण / नवीन विषय अभ्यासक्रम/ नैसर्गिक विस्तार / अतिरिक्त तुकडी वाढ / नवीन विद्याशाखा / निरंतर संलग्निकरण याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्याची **अंतिम तारीख ३१ ऑगस्ट, २०१६** आहे. तरी उपरोक्त संदर्भातील प्रस्ताव सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्कासहित **दि. ३१ ऑगस्ट, २०१६ पूर्वी अ, ब, क आणि ड तक्त्यामध्ये पूर्ण माहिती भरुन विद्यापीठाकडे (A4) पेपर साईज मध्ये DVB-TTSurekh या मराठी भाषेच्या फॉन्टमध्ये तयार करुन सी.डी. सह सादर करावेत.** संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरणाच्या प्रस्तावाचे अर्ज विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडे (प्रकाशन विभाग) विक्रीकरिता उपलब्ध आहेत. त्यानुसार विहीत नमुन्यात अर्ज करावा.

२. **प्रस्ताव संस्थेच्या / महाविद्यालयाच्या कव्हरींग लेटरसह सादर करावा. तसेच भरलेल्या संलग्नता शुल्काचा तपशील कव्हरींग लेटरवर व प्रस्तावात नमुद करावा (उदा. संलग्निकरण शुल्क, धनादेश क्रमांक, पावती क्रमांक व दिनांक). प्रस्तावाच्या फाईलच्या मुखपृष्ठावर महाविद्यालयाने नाव, अभ्यासक्रम, प्रस्ताव कशासाठी आहे (संलग्निकरणाचे नुतनीकरण / नवीन विषय / नैसर्गिक विस्तार / तुकडी वाढ / नवीन विद्याशाखा) व कोणत्या शैक्षणिक वर्षासाठी आहे याचा स्पष्ट उल्लेख करावा. अन्यथा प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.**

३. संलग्निकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, निरंतर संलग्निकरण व नवीन विद्याशाखेचे, नवीन तुकड्यांचे, नवीन विषयांचे अर्ज प्रत्येकासाठी स्वतंत्र शुल्कासह चार प्रतीत पूर्ण माहिती भरुन विद्यापीठाकडे (A 4) पेपर साईजमध्ये सादर करावेत, अन्यथा एकत्रित केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जामधील संलग्निकरणाचे नुतनीकरण अथवा नैसर्गिक विस्तारासाठी मागणी केलेले सक्तीचे व ऐच्छिक विषय तसेच इंटर-डिसीप्लीनरी विषय यांची मांडणी व्यवस्थितपणे नवीन अभ्यासक्रम पाहून करावी. चुकीचा पाठयक्रम / विषय भरलेला अर्ज शासनाकडे शिफारस केला जाणार नाही. उशिरा आलेल्या प्रस्तावावर शासन विचार करीत नसल्याने असे प्रस्ताव शासनाकडे पाठविले जाणार नाहीत, याची कृपया दखल घ्यावी व त्याबाबत विद्यापीठाशी पत्रव्यवहार करु नये.

४. **A.I.C.T.E. च्या अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांचे (नवीन विषय / अतिरिक्त तुकडी / नवीन विद्याशाखा / नैसर्गिक विस्तारासाठीचे) नवीन प्रस्ताव सादर करताना पाच प्रतीत सादर करावेत.**

५. उच्च शिक्षण व सेवायोजन विभागाने कळविलेल्या मुद्याबाबत अर्जात माहिती स्पष्टपणे नमूद करावी अन्यथा शासनाकडून संबंधित माहिती अभावी एखाद्या पाठयक्रम/विषयाची मान्यता नाकारल्यास त्यास सर्वस्वी महाविद्यालय जबाबदार राहील.

*** संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे तसेच विस्ताराचे प्रस्ताव पाठविताना पुढील सूचना प्रामुख्याने लक्षात घ्याव्यात. ***

**१. संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव :-**

केवळ संलग्निकरणाचे नुतनीकरण मागणाऱ्या महाविद्यालयांची संबंधित पाठयक्रमाची व त्याखालील विषयांची मुदत केव्हा संपते हे विद्यापीठाकडून आलेल्या मंजुरीच्या आदेशावरुन पडताळून पाहणे ही त्या महाविद्यालयाची जबाबदारी आहे.

महाविद्यालयांच्या ज्या पाठ्यक्रमाकरिता, विषयाकरिता पूर्वीपासून संलग्निकरण देण्यात आलेले आहे, परंतु २०१६-१७ या वर्षामध्ये संलग्निकरणाचा कालावधी संपत असल्यामुळे २०१७-२०१८ पासून मुदत वाढवावयाची आहे, असे प्रस्ताव पाठविताना त्या प्रत्येक विषयाकरिता प्रत्येक वर्गात मागील तीन वर्षाची विद्यार्थी संख्येची माहिती देण्यात यावी असे प्रस्ताव स्वतंत्र वर्गवारी करुन पाठविण्यात यावेत.

**प्रस्तावासोबत महाविद्यालयांच्या पाठ्यक्रमाकरिता विद्यापीठाने संलग्निकरणाची मान्यता दिलेल्या पत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.**

**२. संलग्निकरणाच्या विस्ताराचे प्रस्ताव :-**

नवीन विषय / पाठ्यक्रम, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या महाविद्यालयामध्ये सन २०१६-२०१७ पासून सुरु करावयाचे आहेत असे प्रस्ताव **सोलापूर विद्यापीठाच्या बृहत आराखड्यानुसार शासनाने विहित केलेल्या सुधारित नमुन्यामध्ये (तक्ता अ, ब, क, ड) पाठवावेत.**

**तक्ता अ -** नवीन विषय / पाठ्यक्रम सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव

**तक्ता ब -** नैसर्गिक वाढीचे विषय सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव

**तक्ता क -** अतिरिक्त तुकड्यांचे प्रस्ताव

**तक्ता ड -** नवीन विद्याशाखा सुरु करण्याकरिता मंजुरीचे प्रस्ताव

**(UG व PG करीता वेगळे फॉर्म उपलब्ध आहेत.)**

**विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(५) अन्वये शासनाची प्राथमिक मान्यता न घेता महाविद्यालयांनी कोणताही विषय / अभ्यासक्रम / तुकडी नव्याने सुरु करु नये. तसेच शासनाकडे विद्यापीठाने प्रस्ताव पाठविल्यानंतर तो मंजूर होईलच असे गृहीत धरुन काही महाविद्यालये नवीन विषय / अभ्यासक्रम / तुकडी सुरु करतात. तसेच शासनमान्य तुकडीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देतात. शासनाच्या व विद्यापीठाच्या परवानगीशिवाय असे विषय/अभ्यासक्रम/तुकडी सुरु केल्यास सदरच्या विषयास/अभ्यासक्रमास/तुकडीस प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा व पात्रता फॉर्म स्विकारले जाणार नाहीत व त्याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयावर राहील यांची कृपया नोंद घ्यावी.**

**३. संलग्निकरणाच्या विस्तारासाठी :-**

नुतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांनी, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ८१ ते ९० अन्वये घालून दिलेल्या सर्व तरतुदींच्या उद्दिष्टांबाबत परिपूर्तता करणे आवश्यक आहे. तसेच निरंतर संलग्निकरणासाठी अर्ज करताना कलम ८८ मधील तरतुदी व अनुषंगिक परिनियमांची पूर्ण केल्या पाहिजेत.

**४.** अर्जात पाठयक्रमाची व त्याखालील विषयांची मराठीत मांडणी करताना त्याचे इंग्रजी पर्यायी शब्द द्यावेत.

५. इतर स्थानिक महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विषयांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्या विषयांची विस्तारासाठी मागणी करु नये. अथवा संबंधित महाविद्यालयांनी परस्पर विचार विनिमय करुन विषयांची विभागणी करुन त्यांची मागणी करावी व तसे संमतीपत्र सोबत जोडावे अन्यथा बदलेल्या परिस्थितीत त्यास शासनाची मान्यता मिळणार नाही. जादा विषयासाठी मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांची पूर्वपरवानगी घेण्यासाठी तसेच जादा तुकड्या किंवा जादा शिक्षकांच्या नेमणुकीस विद्यापीठाची परवानगी घेण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत सोबत जोडावी. शासनाकडून ज्या पाठ्यक्रमास/विषयास संमती मिळेल त्याबाबत स्थानिक चौकशी समिती नेमण्यात येईल. तरी आपला अर्ज प्राथमिक छाननीसाठी शासनाकडे पाठविण्यासाठी नेमून दिलेल्या तारखेपूर्वीच तो या कार्यालयास पोहोचेल याची दक्षता घ्यावी. त्यासोबत **प्रस्ताव व अ, ब, क, ड तक्तामध्ये पूर्ण माहिती भरुन विद्यापीठाकडे (A 4) पेपर साईज मध्ये DVB-TTSurekh या मराठी भाषेच्या फॉन्टमध्ये माहिती बिनचूक भरुन सी.डी. सह पाठविण्याची दक्षता घ्यावी. अपूर्ण प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.** सदर तक्त्यामधील " विद्यापीठाचे अभिप्राय " या रकान्यातील माहिती विद्यापीठ कार्यालयाकडून भरली जाईल.

**संचालक**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**